# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

दूरध्वनी : २५६०१२६१
फॅक्स : ०२०.२५६९९२३२

गणेशखिंड,
पुणे ४११००७.

संदर्भ: शै.प्रवेश/४३३६ दिनांक : १९/१०/२०१८

**तातडीचे/महत्वाचे**

प्रति,
सर्व संस्थाचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
संलग्नित महाविद्यालय पुणे जिल्हा

विषय - शैक्षणिक वर्ष २०१८–१९ मध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती प्रतिपुर्ती योजनेची अंमलबजावणीबाबत.

संदर्भ - शासन पत्र क्र. शिससं/उशि/पुवि/बैठक/२०१८–१९/शिष्यवृत्ती/२५६४ दि. १९/१०/२०१८

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, शासनातर्फे उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या ''राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती" योजनेकरीता विद्यार्थ्यांना उत्पन्न प्रमाणपत्र, डोमीसाईल आणि इतर कागदपत्रे वेळेत मिळावीत याकरीता संबंधित शिक्षण संस्थामध्ये सुविधा केंद्र स्थापन करण्यात याव्यात, असे शासनाने ठरविले आहे.

शिष्यवृत्ती आणि शिष्यवृत्ती पोर्टल संबंधी चर्चा करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी साहेब यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार दि. २०/१०/२०१८ रोजी दुपारी २.३० वाजता मा. जिल्हाधिकारी यांचे दालनात सर्व संस्थाचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, संलग्नित महाविद्यालय, पुणे जिल्हा यांची बैठक आयोजित केलेली आहे. सोबत शासनपत्राची प्रत जोडत आहे. तरी मा. सहसंचालक, उच्चशिक्षण यांनी दिलेल्या सुचनेनुसार आपल्याकडील अद्ययावत माहितीसह बैठकीस उपस्थित रहावे, हि विनंती.

आपला,

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

सोबत :शासन पत्राची पत्र

प्रत :– माहितीसाठी

मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**
Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२
फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. शिससं/उशि/पुवि/बैठक/२०१८-१९/शिष्यवृत्ती/ 2564
**अत्यंत महत्वाचे/मा. जिल्हाधिकारी बैठक दि. २०.१०.२०१८**

दिनांक : १९.१०.२०१८

प्रति,

**सर्व संस्थाचालक,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
संलग्नित महाविद्यालय पुणे जिल्हा.

**विषय : - शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती प्रतिपुर्ती योजनेची अंमलबजावणीबाबत.**

संदर्भ : - जिल्हाधिकारी कार्यालय पुणे (सर्वसाधारण शाखा) यांचे पत्र क्र. पसह/कावि/२६९३/१८ दि. १७.१०.२०१८.

उपरोक्त विषयास अनुसरुन, राज्य शासनातर्फे उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क योजनेकरीता विद्यार्थ्यांना उत्पन्न प्रमाणपत्र, डोमीसाईल आणि इतर कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे. तरी सदर कागदपत्रे विद्यार्थ्यांना वेळेत मिळावीत याकरीता संबंधित शिक्षण संस्थांमध्ये सुविधा केंद्र स्थापन करण्यात याव्यात असे ठरविले आहे. **तरी शिष्यवृत्ती आणि ऑनलाईन स्कॉलरशिप पोर्टल संबंधी चर्चा करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी सो. यांचे अध्यक्षतेखाली शनिवार दि. २०.१०.२०१८ रोजी दुपारी ३.३० वाजता जिल्हाधिकारी यांचे दालनात बैठक आयोजित करणेत आली आहे. तरी उपरोक्त विषयाबाबत आपलेकडील अद्ययावत माहितीसह वेळेवर न चुकता उपस्थित रहावे.**

सोबत - जिल्हाधिकारी कार्यालय पुणे (सर्वसाधारण शाखा) यांचे पत्र.

(डॉ. विजय नारखेडे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत - मा. जिल्हाधिकारी कार्यालय पुणे (सर्वसाधारण शाखा).

# जिल्हाधिकारी कार्यालय पुणे ( सर्वसाधारण शाखा )

दुरध्वनी क्र :- २६१२२३७० ईमेल :-gbpune२०१६@gmail.com

क्र.पसह/कावि/2693/१८
दिनांक १७/१०/२०१८

प्रति,

१) मा.विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक, मध्यवर्ती इमारत पुणे-१
२) मा.प्राचार्य ,शासकीय तंत्र निकेतन पुणे

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती प्रतिपुर्ती योजनेची अंमलबजावणीबाबत

महोदय ,

उपरोक्त विषयाबाबत जिल्हाधिकारी कार्यालय पुणे येथे दिनांक २०/०८/२०१८ रोजी उक्त योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी बैठक आयोजित करणेत आली होती. सदर बैठकीमध्ये उत्पन्न ,डोमासाईल व नॉन क्रिमीलेअर इत्यादी दाखले विदयार्थ्यांना वेळेत मिळण्याकरीता संबंधित शिक्षण संस्थांमध्ये सुविधा केंद्र स्थापन करणेबाबत चर्चा करणेत आली आहे. सदर बैठकीमध्ये दिलेल्या सुचनेनुसार संस्था चालकांच्या वतीने स्टुडन्ट वेलफेअर ऑफीसर अथवा समकक्ष अधिकारी हे नोडल ऑफीसर म्हणुन काम पाहतील असे ठरले आहे. त्यानुसार संबंधित शिक्षण संस्थांनी नोडल ऑफीसर नेमले किंवा कसे १ सदर योजनेची प्रतिपुर्ती करणेकामी किती विदयार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले . संबंधित तहसिलदार यांचेमार्फत किती विदयार्थ्यांनी उत्पन्न ,डोमासाईल व नॉनक्रिमीलेअर चे दाखले काढले . त्याकरीता केलेले कॅम्पचे आयोजन तसेच मागील दोन वर्षात प्रतिपुर्ती केलेली रक्कम या विषयांबाबत **मा. जिल्हाधिकारी सो. यांचे अध्यक्षतेखाली शनिवार दिनांक २०/१०/२०१८ रोजी दुपारी ३.३० वाजता** जिल्हाधिकारी याचे दालनात बैठक आयोजित करणेत आली आहे. तरी उक्त विषयाबाबत आपलेकडील अदयाबत माहितीसह उपस्थित रहावे. तसेच संबंधित संस्थाचालक यांना उपस्थित राहणेबाबत आपलेस्तरावरुन सुचना दयाव्यात.

आपला विश्वासू,

विजयसिंह देशमुख
रजा राखीव उपजिल्हाधिकारी पुणे

प्रत :- सर्व संबंधित संस्थाचालक